आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२४ एप्रिल २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत विक्रमी मतदान, पश्चिम बंगालमधल्या पहिल्या टप्प्यातल्या १५२ पैकी ११० जागा जिंकण्याचा भाजपाला विश्वास

- बिहार विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यात सम्राट चौधरी यांना यश

- भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या मुक्त व्यापार करारावर येत्या सोमवारी स्वाक्षऱ्या होणार

आणि

- आगामी फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत इराणच्या जागी सहभागी व्हायला इटलीचा नकार

<><><><><>

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी काल विक्रमी ८५ टक्क्यांहून अधिक मतदान झालं. करुर जिल्ह्यात ९२ टक्क्यांहून अधिक मतदारांनी मतदान केलं. चेन्नईत पहिल्यांदाच ८३ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली.

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल झालेल्या मतदानाच्या दरम्यान झालेल्या हिंसाचार प्रकरणी पोलिसांनी ४१ जणांना अटक केली आहे. याशिवाय ५७० लोकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. निवडणूक आयोगानं नॉर्थ २४ परगण्यातल्या एका पोलिस ठाण्याच्या प्रमुखाला कामात कुचराई केल्याप्रकरणी निलंबितही केलं आहे. पश्चिम बंगालमध्ये काल ९० टक्क्यांहून अधिक मतदान झाल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी मनोज कुमार अग्रवाल यांनी दिली आहे. कुठल्याही मतदान केंद्रात अप्रिय घटना घडली नाही किंवा कुठेही दीर्घकाळ मतदान बंद नव्हतं असंही त्यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान पश्चिम बंगालमधल्या पहिल्या टप्प्यातल्या १५२ पैकी ११० जागांवर भाजपा जिंकून येईल असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज व्यक्त केला.

कोलकात्यामध्ये वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. मुक्त आणि खुल्या वातावरणात मतदान झाल्याबद्दल त्यांनी निवडणूक आयोग आणि निमलष्करी दलाचे आभार मानले.

<><><><><>

बिहार विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यात मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांना यश मिळालं आहे. विधानसभेच्या विशेष अधिवेशनात आज त्यांनी मांडलेला विश्वासदर्शक प्रस्ताव बहुमतानं मंजूर झाला. २४३ सदस्यांच्या बिहार विधानसभेत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला २०२ सदस्यांचा पाठिंबा आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त देशभरातील लोकप्रतिनिधींचे हार्दिक अभिनंदन केले आहे." जनसेवेसोबतच राष्ट्रसेवेसाठी असलेले समर्पण सर्वांना प्रेरणा देणारे आहे," अशा शब्दांत त्यांनी लोकप्रतिनिधींच्या कार्याचा गौरव केला. यावेळी प्रधानमंत्रींनी संस्कृत श्लोकाचा दाखला देत, जनतेच्या सुखातच राज्यकर्त्याचे सुख आणि हित सामावलेले आहे, असे नमूद केले. ग्रामीण भारताच्या विकासात आणि लोकशाहीच्या बळकटीकरणात पंचायत राज संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचेही त्यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही पंचायत राज दिनानिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहे. पंचायत राज ही देशातील सर्वात जुनी व्यवस्था असून तो लोकशाहीचा मुलभूत स्तंभ असल्याचं शहा म्हणाले.

<><><><><>

केंद्र सरकारनं २०२५-२६ या आर्थिक वर्षांत ७५ लाखांहून अधिक अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी ७ हजार ९८१ कोटी रुपयांहून जास्त रक्कमेचं वाटप केल्याची माहिती सामाजिक न्याय आणि सक्षमीकरणमंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी दिली.

याशिवाय, इतर मागासवर्ग, ज्येष्ठ नागरिक, पारलिंगी व्यक्ती, हातानं मैला उचलणारे कामगार, सफाई कर्मचारी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी विविध कायदे आणि योजनांची अंमलबजावणी देखील केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज भारतीय स्टेट बँकेच्या महाराष्ट्र परिक्षेत्राच्या स्थानिक मुख्यालयाचं पुण्यात उद्घघाटन केलं. देशाच्या विकासात बँकांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचं सीतारामण यांनी आपल्या भाषणात सांगितलं. डिजिटायझेशन महत्वाचं असून त्यामुळेच सर्वसामावेशकतेला चालना मिळते, पण त्याचसोबत आपण आपल्या ग्राहकांपासून दूर न जाता व्यवहारातील मानवी भाव जपायला हवा, असं त्या म्हणाल्या. ग्राहक आणि बँक कर्मचारी यांच्यात प्रत्यक्ष संवादाचं, संबंधाचं महत्त्व अधोरेखित करताना भारतीय स्टेट बँकेच्या प्रयत्नांचं त्यांनी कौतुक केलं.

<><><><><>

देशाचे संरक्षण दल प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांचा आज अमेरिकी लष्करी युद्ध महाविद्यालयाच्या इंटरनॅशनल हॉल ऑफ फेममध्ये समावेश केला गेला. असा बहुमान प्राप्त करणारे ते जनरल व्ही. के. सिंग आणि जनरल बिक्रम सिंग यांच्यानंतरचे तिसरे भारतीय ठरले आहेत. जनरल उपेंद्र द्विवेदी हे स्वतः या लष्करी युद्ध महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. जनरल द्विवेदी यांनी आज या महाविद्यालयाला भेट दिली. महाविद्यालयाचे प्राध्यापक तसंच आंतरराष्ट्रीय विद्यार्थी अधिकाऱ्यांसोबत त्यांनी नेतृत्व, व्यावसायिक तज्ञतेचं लष्करी शिक्षण आणि बदलत्या सुरक्षा परिस्थितीवर संवाद साधला. आपल्या या भेटीत त्यांनी महाविद्यालयातील विविध सुविधांची पाहणी केली, तसंच शैक्षणिक चर्चासत्रांमध्येही सहभाग घेतला.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या मुक्त व्यापार करारावर येत्या सोमवारी स्वाक्षऱ्या होणार आहेत. या करारामुळे दोन्ही देशांना विस्तारित व्यापारी संबंध आणि बाजारपेठेच्या उपलब्धतेचा फायदा मिळेल, अशी अपेक्षा न्यूझीलंडचे प्रधानमंत्री क्रिस्तोफर लक्सन यांनी व्यक्त केली आहे. या करारामुळे न्यूझीलंडच्या निर्यातदारांसाठी विशेषतः बोटींमध्ये वापरल्या जाणाऱ्या आणि ७०हून अधिक देशात निर्यात होणाऱ्या मरीन जेट सिस्टीमच्या उत्पादकांसाठी बाजारपेठ उपलब्ध होईल, असं लक्सन आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत. सध्या काही निर्यातदारांना भारतीय बाजारपेठेत प्रवेश करताना शुल्काचा सामना करावा लागतो आणि या करारामुळे हळूहळू शुल्क कमी होऊन स्पर्धात्मकता सुधारेल असं लक्सन म्हणाले.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२४ एप्रिल २०२६ - शुक्रवार

<><><><><>

येत्या डिसेंबरमध्ये अमेरिकेत मियामी इथं होणार असलेल्या जी ट्वेंटी शिखर परिषदेसाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना निमंत्रित करणार असल्याचं अमेरिकेनं स्पष्ट केलं आहे. मात्र पुतिन यांच्या सहभागाबद्दल आपण साशंक असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. पुतिन या परिषदेतली उपस्थिती उपयुक्त ठरेल असंही ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

रशियानं २०२२ मध्ये युक्रेनवर हल्ला केल्यानंतर बहुतांश पाश्चात्य देशांनी पुतिन यांच्यावर बहिष्कार टाकला आहे. या पार्श्वभूमीवर या परिषदेसाठीचं निमंत्रण रशियावरचा दबाव कमी होत असण्याच्यादृष्टीनं महत्वाचं मानलं जात आहे.

<><><><><>

भारतीय नागरिकांनी हवाई किंवा रस्ते कोणत्याही मार्गानं इराणचा प्रवास करू नये असा सल्ला इराणमधील भारतीय दूतावासानं दिला आहे. प्रादेशिक तणावामुळे हवाई उड्डाणांवर असलेले निर्बंध आणि अनिश्चितता कायम असल्यानं आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर परिणाम होत असल्याचं दुतावासानं म्हटलं आहे. भारतीय नागरिकांनी दूतावासाशी समन्वय राखत निर्धारित मार्गांनीच देश सोडावा असंही आवाहन केलं आहे.

<><><><><>

संयुक्त अरब अमिरातीनं येत्या दोन वर्षांत आपल्या पन्नास टक्के सरकारी सेवा कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या आधारे चालवण्याचं नियोजन केलं आहे. हा बदल सार्वजनिक क्षेत्राशी संबंधित व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या मोहिमेचा हा एक भाग असल्याचं संयुक्त अरब अमिरातीचे उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्री शेख मोहम्मद बिन रशीद अल मक्तूम यांनी म्हटलं आहे. प्रशासनात नोकरशाहीचं प्रमाण कमी करणं, खर्चात कपात करणं आणि सेवा वितरणाचा वेग वाढवणं या उद्देशानं हा बदल केला जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

अल्जेरिया आणि स्पेनदरम्यानच्या समुद्रात बोट उलटून झालेल्या अपघातात १७ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये १२ पुरुष आणि ५ महिलांचा समावेश आहे. हे सर्वजण सोमालीयन नागरिक असून ते अवैध मार्गानं युरोपच्या दिशेनं जात असताना ही दुर्घटना घडल्याची माहिती अल्जेरियातील सोमालियाचे राजदूत युसुफ अहमद हसन यांनी दिली.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२४ एप्रिल २०२६ - शुक्रवार

**<><><><><>**

आगामी फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत इराणच्या राष्ट्रीय फुटबॉल संघाऐवजी इटलीला संधी देण्याचा प्रस्ताव इटलीच्या क्रीडा अधिकाऱ्यांनी फेटाळून लावला आहे. इराणनं या स्पर्धेतून माघार घेतली तर इटलीचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव अमेरिकेचे दूत पाओलो झाम्पोली यांनी मांडल्याचं वृत्त होतं. त्यावर इटलीनं ही प्रतिक्रिया दिली. अशा प्रकारची कृती योग्य नसल्याचं इटलीचे क्रीडा मंत्री अँड्रिया अबोदी यांनी म्हटलं आहे. ऑलिंपिक समितीचे अध्यक्ष लुसियानो यांनीही स्पर्धेसाठीची पात्रता केवळ गुणवत्तेवरच मिळायला हवी असं म्हटलं आहे. दरम्यान या स्पर्धेतले इराणचे अमेरिकेत होणारे सामने नियोजित वेळापत्रकानुसारच होतील असं फिफानं स्पष्ट केलं आहे.

//<><><><><>//